# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी

दिनांक:- ०३/०१/२०२५.

**<u>क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन.</u>**

शासन परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांच्या निर्देशानुसार दि.०३/०१/२०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील सभागृहात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या यतीने मा.अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

स्त्रीयांबद्दलची चुल व मुल ही भावना मोडीत काढून ज्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रुजविला. स्त्रीयांना शिक्षित करीत त्यांना सन्मानाचे जीवन मिळवून दिले, त्यामुळे आधुनिक काळातील स्त्रीयांचीही संपूर्ण जीवनशैलीच बदलून टाकली. अशा स्त्री शिक्षणाच्या अराध्य दैवत, भारतातील प्रथम शिक्षिका व प्रथम मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आजच्या १९४ व्या जयंतीनिमित्ताने महानगरपालिकेतर्फे पुष्पहार अर्पण करुन आदरांजली देण्यात आली.

याप्रसंगी मा. अति आयुक्त श्री. देविदास पवार, उप-आयुक्त श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, श्री. शैलेश दोंदे, श्रीम. प्रणाली घोंगे, डॉ. अनुराधा बाबर, मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, सहा. आयुक्त सामान्य प्रशासन श्री. अजित महाडीक, आरोग्य विभाग प्रमुख श्री. जे. एम. सोनावणे, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेश पवार व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(श्रीकांत परदेशी)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका